# प्रेसनोट

शासन परिपत्रक महसूल वनविभाग क्रं.ईएनटी-२०१५/प्र.क्र.६७/टी-१,दिनांक२६मार्च,२०१५ अन्वये राज्यात प्रत्येक जिल्हयात केबल जोडण्यांच्या संदर्भात विनाक्रम (रॅण्डम) सर्वेक्षण करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यासाठी जळगांव जिल्हयातील **ग्रुप क्रं.(१), ग्रुप क्रं.(२), ग्रुप क्रं.(३),च्या पुढील** सर्व अशा सदर तिनही ग्रुप मधून माहे **जून २०१७** साठी प्रत्येकी एक केबल परिचालकांचे विनाक्रम (रॅन्डम) सर्व्हेक्षण करणेकामी केबल परिचालक यांची निवड सोडत पध्दतीने करावयाची आहे.

जळगांव जिल्हयातील केबल परिचालक व बहुविधयंत्रणा परिचालक यांनी घोषित केलेल्या केबल जोडण्यांचे विनाक्रम सर्वेक्षण करण्याकरिता **दिनांक *०३/०६/२०१७ शनिवार*** रोजी सकाळी **११.००** वाजता मा.विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक रोड येथील नियोजन भवन येथे सोडत घेण्यात येणार आहे.

या सोडतीसाठी जळगांव जिल्हयातील **ग्रुप क्रं.(१)-१ ते ४०,ग्रुप क्रं.(२)- ४१ ते १०० व ग्रुप क्रं.(३)- १०१ च्या पुढील सर्व** जोडणी संख्या असलेल्या स्थानिक केबल परिचालक व एक बहुविध यंत्रणा परिचालक यांची निवड करण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील ज्या केबल परिचालकांकडे वरील ग्रुप प्रमाणे जोडणी संख्या आहे त्यांनी वरील ठिकाणी विहीत दिनांक व वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी जळगांव यांनी केले आहे.

क्रं.करम/कावि/७३९ /२०१७
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव, दिनांक :-२९/०५/२०१७

**स्वाक्षरीत/-**
**अपर जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव.**
२/-सदर बातमी दिनांक०१/०६/**२०१७** रोजी प्रसिध्द होणा-या जळगाव जिल्ह्यातील सर्व दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावी.

**प्रत**:- जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी,जळगांव यांचेकडे सदर बातमी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी अग्रेषित.

**प्रत** :-सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :-मा. उप आयुक्त (करमणूक शुल्क) नाशिक विभाग यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

**अपर जिल्हाधिकारी जळगाव करिता.**